# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women In Distress Situation**

**Police Station** :- **EOW, SP Offic, Washim**

**Date of Good Work done** :- **05/01/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे.वाशिम श.येथे दाखल महिला बचत गटाच्या गुन्ह्यातील आरोपी पती-पत्नीला पो.नि.सोयस्कर,आ.गु. शाखा व त्यांच्या पथकाने अटक केली असून पुढील तपास सुरू आहे अशा फसवणूक करणाऱ्या पासून सावध राहा व त्यांची माहिती पोलिसांना देणे बाबत नागरिकांना आवाहन केले आहे.



## आर्थिक फसवणुक प्रकरणी पती-पत्नीस अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...

### गुन्हे दाखल ; आर्थिक गुन्हे शाखेची कारवाई

**वाशीम** ▪ प्रलोभन दाखवुन बचत गटातील महिलांची आर्थिक फसवणुक केल्याप्रकरणी एका दाम्पत्यावर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर कारवाई आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे.

या संदर्भात प्राप्त माहितीनुसार शहरातील काळे फाईल भागात राहणारे अर्चना जाधव आणि संतोष जाधव यांनी फिर्यादीसह बचत गटातील इतर १९ महिलांचा विश्वास संपादन करून व आमिष दाखवून त्यांची अठरा लाख ६५ हजार २३ रुपयाने फसवणुक केला. दरम्यान, यासंदर्भात पार्वती राजेंद्र खासबागे या महिलेने वाशीम शहर पोलीसात तक्रार दिली.

या तक्रारीवरुन वाशीम शहर पोलीसांनी अपराध क्रमांक १४५७ / २१ कलम ४०६ , ४२० , ३४ भादवी नुसार गुन्हा दाखल केला.

वरील दोन्ही आरोपीस आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे . सदर कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंग, अतिरीक्त पोलीस अधिक्षक गोरख भामरे, उप विभागीय पोलिस अधिकारी यशवंत केडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक उदय सोयस्कर, हेड कॉन्स्टेबल श्रीराम मिश्रा, विनोद मारकंडे, कैलास सरसरे , भुषण कुन्हेकर, मारोती गायकवाड, महिला पोलीस शर्वीनी पखाले यांनी केला. (जि.प्र.)